# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 15 December 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १५ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य सरकारच्या आज सायंकाळी होणाऱ्या मंत्रीमंडळ विस्तारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे काही वेळापूर्वीच नागपुरात दाखल झाले आहेत. राजभवनात होणाऱ्या मंत्रीमंडळाच्या विस्तारात भाजपाकडून ज्येष्ठ आमदार चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, गरीश महाजन, आशिष शेलार यांच्यासह मराठवाड्यातील पंकजा मुंडे, अतुल सावे, मेघना बोर्डीकर आदी १९ जण मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचं वृत्त आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आमदार हसन मुश्रीफ, नरहरी झिरवळ, अनिल पाटील, आदिती तटकरे, बाबासाहेब पाटील, इंद्रनील नाईक यांच्यासह ९ जणांचा समावेश होणार असल्याची चर्चा आहे. तसंच शिवसेना पक्षाकडून आमदार उदय सामंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय शिरसाठ यांच्यासह १२ जणांना मंत्रीपदाची शपथ देण्यात येणार असल्याचं वृत्त आहे.

****

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच देवेंद्र फडणवीस यांचं आज दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमान तळावर आगमन झालं. त्यामुळं त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विमानतळापासून धरमपेठ येथील त्यांच्या निवासस्थानापर्यंत स्वागत रॅली काढण्यात आली आहे. विमानतळावर वार्ताहारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा संविधानानं निर्माण केलेल्या संस्थांवर विश्वास नसल्यांची टीका केली. दरम्यान, सायंकाळी मंत्रीमंडळाच्या विस्तारानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी होणार

असून, त्यानंतर सायंकाळी ६ वाजता मुख्यमंत्री फडणवीस पत्रकार परिषद घेणार आहेत.

****

भारताचे पहिले गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आदरांजली वाहिली. सरदार पटेल यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे कार्य देशाची एकता आणि अखंडता तसचं विकसित भारताचे स्वप्न साध्य करण्यासाठी प्रेरणास्थान असल्याचं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तसंच देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनीही सरदार पटेल यांना आदरांजली वाहत पाचशे पेक्षा अधिक संस्थानांचे विलनीकरण करून आधुनिक भारताच्या निर्मितीची पायाभरणी केली असल्याचं आपल्या सामाजिक माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाची जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषद वेव्हज २०२५ येत्या ५ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं होणार आहे. भारताला माध्यम आणि मनोरंजनाचं जागतिक केंद्र म्हणून स्थापित करणं, विविध प्रकारच्या सहकार्यासाठी संधी प्रदान करणं आणि भारतीय प्रतिभेला प्रदर्शित करणं हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे. ही परिषद प्रतिनिधींसाठी तीन दिवस खुली असणार आहे. तर शेवटचे दोन दिवस सामान्य जनतेला या परिषदेत उपस्थित राहता येईल.

****

राज्यात थंडीची लाट कायम आहे. अनेक ठिकाणी किमान तापमानात घाट झाली आहे. आज सकाळी छत्रपती संभाजीनगर शहराचं तापमान ८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस एवढं नोंदवल. त्याचवेळी परभणी जिल्ह्यात ४ पूर्णांक ६ दशांश, धुळे जिल्ह्यात ४ पूर्णांक १ दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. तसंच येत्या २४ तासांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून राज्यभरात टंकलेखन परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेच्या छत्रपती संभाजीनगर शहरातील शिवाजी हायस्कूल इंथल्या परीक्षा केंद्रात तीन बनावट परीक्षार्थी आढळुन आले आहेत. भरारी पथकांनी या परीक्षा केंद्राला भेट दिल्यानंतर काल हा प्रकार उघडकीस आला आहे. तीन बनावट, तीन मुळ परीक्षार्थी आणि दोन टंकलेखन संस्थाचालकांच्या विरोधात क्रांती चौक पोलीस ठाण्यात मध्यरात्री गुन्हा  नोंदविण्यात आला. आरोपींमध्ये संदीप शिंदे, विशाल भिल्लारे, परमेश्वर जोगदंड या बनावटसह मूळ परीक्षार्थी अभिजित  सूर्यवंशी, अमित सुपेकर आणि श्रीराम प्रधान यांचा समावेश आहे. तसंच टंकलेखन संस्थाचालक उषा तुपविहरे आणि महावीर चांदीवाल यांचाही आरोपींमध्ये समावेश करण्यात आला आहे.

****

नांदेड जिल्ह्यात काल  राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली होती, जिल्ह्यातील ११  हजार ९७७  प्रकरणे या लोकअदालतीत सामोपचाराने निकाली काढून विविध प्रकरणात ४७  कोटी २९ लाख 33 हजार रुपये  रक्कमेची तडजोड करण्यात आली.

****

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलिया संघानं ९४ षटकात ६ बाद ३६० अशी आश्वासक सुरुवात केली आहे. आज सकाळी खेळ सुरू झाल्यानंतर यजमानांचे तीन गडी ७५ धावांवर बाद झाले होते. सामन्याचा पहिला दिवस तेरा षटके वगळता पावसामुळे वाया गेला. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ १-१ असे बरोबरीत आहेत.

****